(फक्त कार्यालयीन उपयोगाकरीता)

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

## अलग लेखा परीक्षा अहवाल

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई
लेखावरील भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांचा
अलग लेखा परीक्षा अहवाल वर्ष २०१३-१४

# Maharashtra Water Resources Regulatory Authority

## Separate Audit Report

## SEPARATE AUDIT REPORT BY COMPTROLLER & AUDITOR GENERAL OF INDIA ON THE ACCOUNTS FOR THE YEAR 2013-14

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई

९ वा मजला, सेंटर - १, वर्ल्ड ट्रेड सेंटर,
कफ परेड, मुंबई - ४००००५.

## अलग लेखा परीक्षा अहवाल आर्थिक वर्ष २०१३-१४



| अ.क्र. | अलग लेखा परीक्षा अहवाल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १) | लेखे दाखल करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे | १ |
| २) | अलग लेखा अहवाल व अनुपालन | २-९ |
| **SEPARATE AUDIT REPORT** | | |
| **3)** | **Reason for delay in submission of accounts for the F. Y. 2013-14** | **10** |
| **4)** | **Separate Audit paras for F. Y. 2013-14 by A. G. and Compliances/ replies Thereof by MWRRA.** | **11- 18** |

## १) २०१३-१४ या वित्तीय वर्षाचे लेखे दाखल करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या २०१३-१४ या वर्षाचा लेख्यांची आणि महालेखापालांनी केलेल्या लेखापरीक्षेची संगतवार मांडणी आणि शासनाच्या मंजुरीसाठी पुढीलप्रमाणे ते सादर करण्यात आले:-

१. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने वित्तीय वर्ष २०१३-१४ चे वार्षिक लेखे दिनांक १९-५-२०१४ रोजी तयार ठेवले.

२. मजनिप्राने नेमलेल्या सनदी लेखापालांनी दिनांक १७-६-२०१४ ते १८-६-२०१४ या दरम्यान लेखापरीक्षा पूर्ण केली आणि दिनांक १९-६-२०१४ रोजी सदर लेखा परीक्षीत अहवाल मजनिप्राला मिळाला.

३. त्यानंतर, वित्तीय वर्ष २०१३-१४ या वर्षाकरिता सनदी लेखापालांनी लेखापरीक्षा केलेले लेखे, दिनांक २३-६-२०१४ रोजी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या होणाऱ्या पुढील बैठकीत स्वीकृत करण्यासाठी सादर केले.

४. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये उक्त लेख्यांना दिनांक २५-६-२०१४ रोजी स्वीकृत करण्यात आले आणि त्यानंतर स्वीकृत लेखे मजनिप्राचे पत्र क्र. एमडब्लूआरआरए/ एजी ऑडीट/२०१३-१४/ ४५४ दिनांक ३०-६-२०१४ अन्वये प्राधिकरणाच्या ठरावासह महालेखापालांकडे सादर करण्यात आले.

५. त्यानुसार, महालेखापालाच्या कार्यालयाने उक्त लेख्यांचे दिनांक १४-०७-२०१४ ते २५-७-२०१४ या दरम्यान लेखापरीक्षा केली.

६. महालेखापाल कार्यालयाने वित्तीय वर्ष २०१३-१४ करीता अंतिम स्वरुपातील स्वतंत्र लेखा अहवाल, प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय यांना पाठवला व त्याची प्रत, त्यांचे पत्र क्रमांक अहवाल एस ए आर/मजनिप्रा/२०१३-१४/१५० दिनांक २६-१२-२०१४ च्या पत्राद्वारे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाला पाठवली, ती दिनांक ५-०१-२०१५ रोजी प्राधिकरण्यास प्राप्त झाली.

**प्रधान सचिव**
**जलसंपदा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई**

**दिनांक :- १६/३/२०१५**

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई

२) ३१ मार्च, २०१४ (वित्तीय वर्ष २०१३-१४ ) रोजी समाप्त होणाऱ्या अलग लेखा परीक्षा अहवालावरील उत्तर/ अनुपालन

संदर्भ :- महालेखापाल यांच्या कार्यालयाचे पत्र क्रमांक एसएआर/मजनिप्रा / २०१३-१४/१५० दिनांक २६-१२-२०१४

| परिच्छेद क्रमांक | महालेखापालांचा अलग लेखा परिच्छेद | अनुपालन जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | **दिनांक ३१ मार्च, २०१४ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या लेख्यांवरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा स्वंतत्र लेखापरीक्षा अहवाल.** आम्ही, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांनी दिनांक ३१ मार्च, २०१४ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या यासोबत जोडलेल्या ताळेबंदाची आणि त्या दिनांकाला संपणाऱ्या वर्षाच्या उत्पन्न व खर्च लेखा आणि जमा रकमा व प्रदान लेखा यांचा नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्य,अधिकार व सेवा शर्ती) अधिनियम, १९७१ यांच्या कलम २० (१) तसेच महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ याच्या कलम १९ (२) या अन्वये, लेखापरीक्षा केली. दिनांक ३१ मार्च, २०१५ पर्यंतच्या कालावधीची लेखापरीक्षा करणे सोपविण्यात आले होते. या वित्तीय विवरणपत्राची जबाबदारी प्राधिकरणाच्या व्यवस्थापनावर आहे. आमच्या लेखापरीक्षेवरील या वित्तीय विवरणापत्राच्या आधारे जबाबदारी आहे. | भाष्य नाही. |

| परिच्छेद क्रमांक | महालेखापालांचा अलग लेखा परिच्छेद | अनुपालन<br>जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई |
|---|---|---|
| २ | स्वतंत्र लेखापरीक्षा अहवालातील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कॅग) यांचे भाष्य हे वर्गीकरण, सर्वोत्तम लेखांकन प्रथेशी अनुरुपता, लेखांकनाची मानके आणि प्रमाण पध्दती उघड करणे, इत्यादी या सबंधातील लेखांकन कार्यपध्दतीवरच केवळ आधारित आहे. कायदे, नियम व विनियम (औचित्य व नियमितता) आणि कार्यक्षमता नि कामगिरीची बाजू, इत्यादी अनुपालनाच्या संबंधातील वित्तीय व्यवहारा-वरील लेखापरीक्षा निरीक्षणे, जर कोणताही असल्यास, निरीक्षण अहवालाद्वारे/कॅगच्या लेखापरीक्षा अहवालाद्वारे स्वंतत्रपणे आधारलेली आहेल. | भाष्य नाही. |
| ३ | भारतात सर्वसाधारणपणे स्वीकृत लेखांकन मानकांनुसार आम्ही आमची लेखापरीक्षा पार पाडली आहे. या मानकांनुसार आम्ही आमची लेखापरीक्षा अशाप्रकारे पार पाडली की वित्तीय विवरणपत्रात कोणतेही महत्वाचे असत्यकथन नसेल. चाचणीवर आधारित व रकमांच्या पुष्टयर्थ पुरावा देऊन आणि वित्तीय विवरणे उघड करुन लेखापरीक्षा केली आहे. लेखापरीक्षेमध्ये वापरण्यात आलेल्या लेखांकनाच्या तत्वाचे निर्धारण आणि व्यवस्थापनाने वर्तवलेले महत्वाचे अंदाज, त्याचप्रमाणे वित्तीय विवरणाच्या एकंदर सादरीकरणाचे मूल्यमापन, या गोष्टी अंतर्भूत आहेत. आमच्या लेखापरीक्षेतून आमच्या मतांच्या | भाष्य नाही. |

| परिच्छेद क्रमांक | महालेखापालांचा अलग लेखा परिच्छेद | अनुपालन<br>जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई |
|---|---|---|
| | पुष्ट्यर्थ योग्य आधार मिळेल असा विश्वास आम्हाला वाटतो. | |
| ४ | **आमच्या लेखापरीक्षेच्या आधारे, आम्ही पुढील अहवाल देतो:-** | |
| ४.१ | आमच्या लेखापरीक्षेसाठी आमच्या मते व आमच्या माहितीनुसार आम्हाला आवश्यक अशी सर्व माहिती व स्पष्टीकरणे प्राप्त आम्ही प्राप्त करुन घेतली. | भाष्य नाही. |
| ४.२ | या अहवालाशी संबंधीत ताळेबंद, उत्पन्न व खर्च लेखा आणि जमा रकमा व प्रदान लेखा हे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ च्या प्रकरण ५ मधील कलम १९ (१) लक्षात घेऊन तयार करण्यात आले आहे. तसेच उत्पन्न हे रोखतेच्या आधारावर आणि खर्च हा प्रत्यक्ष खर्चाच्या (accrual) आधारावर लेखांकित केला आहे. सन २०१३-१४ चा वार्षिक लेखा अहवाल मजनिप्राने २५ जून २०१४ रोजी मान्य केला आहे. | भाष्य नाही. |
| ४.३ | आमच्या मते, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ याच्या कलम १९ (१) अन्वये आवश्यक असल्यानुसार प्राधिकरणाने यथोचित लेखापुस्तके व अन्य संबध्द अभिलेख परिरक्षित केला आहे. | भाष्य नाही. |

| परिच्छेद क्रमांक | महालेखापालांचा अलग लेखा परिच्छेद | अनुपालन<br>जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई |
|---|---|---|
| ५ | **आम्ही आणखी असे कळवू इच्छितो की :-** | |
| ५.१ | **ताळेबंद** | |
| ५.१.१ | **मत्ता** | |
| (ग) | **जागेची किंमत रु २२.८८ कोटी** | |
| | हि रक्कम सिकॉम मर्या. ला महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणास कार्यालयाच्या वापरातील जागा भाडेपट्टीवर/ लिजवर हस्तांतरीत करण्यासाठी दिनांक ३१/३/२०१३ रोजी प्रदान केलेली लिजची किंमत दर्शविते. ही रक्कम भाडेच्या/ लिजच्या उर्वरित (३५ वर्ष) घटत जाणारी ठेवणे आवश्यक आहे. परिणामत: रु. ०.६५ कोटीने मत्ता विवरण जास्त आणि खर्च विवरण कमी झाले आहे. | शेऱ्यांची नोंद महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने घेतलेली असल्यामुळे कोणतेही भाष्य नाही. |
| ६ | **सर्वसाधारण** | |
| ६.१ | **ताळेबंद** | |
| | **स्थिर व इतर मत्ता - रु. १.३३ कोटी** | |
| | महाराष्ट्र शासन निर्णय क्र. आयटिएस/ फाईल - ०७ /प्र. क्र. ८९/३९, दिनांक १ ऑगस्ट, २०११ नुसार संगणक, लॅपटॉप, सर्व्हर व अन्य माहिती तंत्रज्ञान उपकरणची आयुमर्यादा ५ वर्ष ठरविण्यात आली व त्यामुळे दर २०% इतका येतो. मात्र प्राधिकरणाने घसारा ६०% दराने आकारला आहे, परिणात, एवढया मर्यादे पर्यंत मत्ता विवरण कमी व खर्चाचे दयित्त्व विवरण आधिक झाले आहे. | महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने शेऱ्यांची नोंद घेतलेली आहे म्हणून कोणतेही भाष्य नाही. |

| परिच्छेद क्रमांक | महालेखापालांचा अलग लेखा परिच्छेद | अनुपालन<br>जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई |
|---|---|---|
| ६.२ | **वार्षिक लेख्यांच्या विवरणात मागील वर्षाची शिल्लक दर्शविण्यात आलेली नाही.**<br>प्राधिकरणाने मागील वर्षाच्या (२०१२-१३) लेख्यांची संबंधित आकडेवारी लेखा-विवरणपत्रात दर्शविलेली नाही; जसे, जमा रकमा व प्रदान लेखा, प्राप्त व खर्च लेखा, ताळेबंद व संबंधित अनुसूच्या. | महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने शेऱ्यांची नोंद घेतलेली आहे म्हणून कोणतेही भाष्य नाही. |
| ६.३ | **महत्वाची लेखा धोरणे, लेख्यांसंबंधी टिप्पण्या इत्यादी**<br>जोडलेली आर्थिक विवरणसोबत महत्वाची लेख्या धारणे व लेख्यांवरील टिप्पण्यांमध्ये घसारा पध्दत, लेखे तयार करण्याचा आधार, गुंतवणूकीचे मूल्यमापान, उचल व त्याबाबतच्या तरतूदी, सेवानिवृत्ती लाभांशी तरतूद, मालमत्तेचे मूल्यमापन, आकास्मित दायित्वाची तरतूर, करांसाठीची तरतूद इत्यादी चा तपशील समाविष्ठ नाही. | महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने शेऱ्यांची नोंद घेतलेली आहे म्हणून कोणतेही भाष्य नाही. |
| ७ | **लेखा परीक्षा भाष्यांचे परिणाम**<br>मागील परिच्छेदांमध्ये दिलेल्या लेखापरीक्षा भाष्यांचे परिणाम असा झाला की दिनांक ३१.३.२०१४ रोजी रु. ०.६५ कोटींनी मत्ता अधिक व दायित्वे कमी दाखविण्यात आले. | महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने शेऱ्यांची नोंद घेतलेली आहे म्हणून कोणतेही भाष्य नाही. |
| ८ | **सहाय्यक अनुदान**<br>रु. २.४३ कोटी इतक्या एकूण अनुदानापैकी (यात प्रारंभिक शिल्लक रु. ०.४४ कोटी व मिळलेले अनुदान रु. १.९९ कोटी अंतर्भूत आहे) प्राधिकरणाने रु. २.४३ कोटी | भाष्य नाही. |

| परिच्छेद क्रमांक | महालेखापालांचा अलग लेखा परिच्छेद | अनुपालन<br>जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई |
|---|---|---|
| | इतक्या रक्कम वापरल्याने दिनांक ३१ मार्च २०१४ रोजी निरंक रक्कम राहिली. | |
| ९ | मागील परिच्छेदांमधील आमच्या निरीक्षणांच्या अधीनतेने आम्ही असे कळवू इच्छितो की, ताळेबंद, उत्पन्न व खर्च लेखा आणि जमा रक्कम व प्रदान लेखा जे या अहवालानुसार लेखा पुस्तकाशी करारबध्द आहेत, असा अहवाल आम्ही दिला आहे. | भाष्य नाही. |
| १० | आमच्या मते आणि आम्हाला मिळालेल्या माहिती व स्पष्टीकरणाच्या आधारे, उक्त वित्तीय विवरण तसेच लेखांकन धोरणे आणि लेख्यांवरील टिप्पण्या आणि वर नमूद केलेल्या महत्त्वाच्या बाबी व जोडपत्र एकमध्ये नमूद केलेल्या अन्य बाबींच्या अधिनतेने अहवालातील संपूर्ण माहिती ही भारतात सर्वसाधारणपणे अवलंबण्यात येणाऱ्या लेखांकन तत्त्वांना अनुसरुन तसेच सत्य व योग्य माहिती आहे.<br>महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या, मुंबई दिनांक ३१ मार्च, २०१४ पर्यंतच्या कामकाजाच्या ताळेबंद प्रमाणे आहे आणि<br>त्या दिनांकाला संपणाऱ्या वर्षाचा खर्च व प्रदान लेखाशी आधिक्यांशी संबंधित आहे. | भाष्य नाही. |

# जोडपत्र

| अनु क्रमांक | महालेखापालांचा अलग लेखा परिच्छेद | अनुपालन<br>जलसंपदा विभाग मंत्रालय, मुंबई |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | **वित्तीय मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी**<br>प्राधिकरणाने स्थिर मत्ता नोंदवही ठेवली आहे. मत्तांच्या प्रत्यक्ष पडताळणी १ एप्रिल, २०१४ रोजी घेण्यात आली, व मत्तांच्या प्रत्यक्ष पडताळणीचे प्रमाणपत्र नोंदवण्यात आले आहे. | भाष्य नाही. |
| २ | **अंतर्गत लेखापरीक्षा पध्दतीची व नियंत्रण यंत्रणेची पर्याप्तता**<br>स्वतंत्र अंतर्गत लेखा परीक्षा कक्ष अस्तित्वात नाही, मात्र, २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे अंतर्गत लेखापरीक्षण सांविधिक लेखापरीक्षकांकडून जून २०१४ मध्ये (सनदी लेखापाल) करुन घेण्यात आले आहे.<br>प्राधिकरणाने मे, २०१३ मे मार्च, २०१४ या दरम्यान आकस्मिक रोख रक्कम पडताळणी केली होती.<br>मजनिप्राने त्यांच्या प्राधिका-यांचे वित्तीय अधिकार विहित केलेले नाहीत. त्या अभावी झालेला खर्च सक्षम प्राधिका-याने केला आहे व कसे हे तपासणे शक्य झालेले नाही. | महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे काम हे अर्ध न्यायिक प्रकारचे आहे आणि त्यात बांधकाम किंवा क्षेत्रीय काम अंतर्भूत नाही. तसेच महालेखापालांच्या निर्देशानुसार मजनिप्राचे अंतर्गत लेखापरीक्षा (चाचणी लेखापरीक्षा) काम सनदी लेखापरिक्षकांकडून केले जाते. म्हणून स्वतंत्र अंतर्गत लेखापरीक्षा पध्दती आणि अंतर्गत नियंत्रण यंत्रणेची आवश्यकता नाही. तथापि, मे २०१३ पासून आकस्मिक रोख रक्कम पडताळणीची सुरुवात करण्यात आली आहे.<br>मजनिप्राने दिलेल्या अभिप्रायांशी शासन, सर्वसाधारपणे सहमत आहे. |

| अनु क्रमांक | महालेखापालांचा अलग लेखा परिच्छेद | अनुपालन<br>जलसंपदा विभाग मंत्रालय, मुंबई |
|---|---|---|
| ३ | **सांविधिक देय रकमा प्रदान करण्यातील नियमितता**<br>आयकर, भविष्य निर्वाह निधी, गट विमा योजना, व्यवसाय कर यांसारख्या सांविधिक देय रकमा महामंडळाकडून नियमितपणे प्रदान केल्या जातात. | भाष्य नाही. |

भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांच्या करिता

व त्यांच्यावतीने

स्वाक्षरी
प्रधान महालेखापाल

ठिकाण : मुंबई
दि.: २६/१२/२०१४

स्वाक्षरी
प्रधान सचिव
जलसंपदा विभाग
मंत्रालय, मुंबई
दि. : १६/३/२०१५

## 3) Reasons for delay in submission of Accounts for the Financial Year 2013-14

Chronological sequence of preparation of Accounts of MWRRA for 2013-14 and its auditing by A. G. and further submission to Govt. for approval is as below:-

1) Accounts of MWRRA for the Financial Year 2013-14 were kept ready on 19-5-2014 for Audit.

2) Chartered Accountant appointed by MWRRA completed the audit during 17-6-2014 to 18-6-2014 and submitted the Audit Report on 19-6-2014 to MWRRA.

3) The audited Accounts by Chartered Accountant for Financial Year 2013-14 were put up for approval on 23-6-2014 to the meeting of MWRRA for adoption of the said Accounts.

4) The MWRRA has adopted the said Accounts on 25-06-2014 and then submitted it along with resolution to A.G. office vide MWRRA's letter No. MWRRA/ AG Audit/ 2013-14/ 454 dated 30-6-2014.

5) A.G. office audited the Accounts during 14-7-2014 to 25-7-2014

6) A.G. Office has sent Final Separate Audit Report for the Financial Year 2013-14 to Pr. Secretary, Water Resources Department, Mantralaya and copy to MWRRA vide their letter no. एस ए आर/ म.ज.नि.प्रा/ २०१३-१४/१५० दि. २६/१२/२०१४ received to MWRRA on 5-1-2015 (AN)

Pr. **Secretary**
**Water Resources Department,**
**Mantralaya, Mumbai.**

**Date:- 16-3-2015**

## 4) Maharashtra Water Resources Regulatory Authority, Mumbai

### Reply/Compliance to the Separate Audit Report for the year ended on 31st March 2014 (F.Y. 2013-14)

**Ref.:- A.G.'s Office letter No. एस.ए.आर./म.ज.नि.प्रा/२०१३-१४/१५० दि. २६/१२/२०१४**

| Para No. | Separate Audit Report of A.G. | Comments by Water Resources Department, Mantralaya, Mumbai |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| | **Separate Audit Report of the Comptroller & Auditor General of India on the Accounts of Maharashtra Water Resources Regulatory Authority, Mumbai for the year ended 31st March 2014.**<br>We have audited the attached Balance Sheet of Maharashtra Water Resources Regulatory Authority (MWRRA), Mumbai for the year ended 31st March 2014 and the Income & Expenditure Account and Receipts & Payment Account for the year ended on that date under Section 20(1) of the Comptroller & Auditor General's (Duties, Powers & Conditions of Service) Act, 1971 read with Section 19(2) of Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005. The audit has been entrusted for the period up to 31st March 2015. These financial statements are the responsibility of the Authority's Management. Our responsibility is to express an opinion on these financial statements based on our audit. | No comments. |

| Para No. | Separate Audit Report of A.G. | Comments by Water Resources Department, Mantralaya, Mumbai |
|---|---|---|
| | 2. This Separate Audit Report contains the comments of the Comptroller & Auditor General of India (CAG) on the accounting treatment only with regard to classification, conformity with the best accounting practices, accounting standards and disclosure norms, etc. Audit observations on financial transactions with regard to compliance with the Laws, Rules & regulations (Propriety and Regularity) and efficiency-cum-performance aspects. etc. if any are reported through Inspection Reports/ CAG's Audit Reports separately. | No comments. |
| | 3. We have conducted our audit in accordance with Auditing Standards generally accepted in India. These standards require that we plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatements. Audit includes examining, on a test basis, evidences supporting the amounts and disclosure in the financial statements. An Audit also includes assessing the accounting principles used and significant estimates made by the management, as well as evaluating the overall presentation of financial statements. We believe that our audit provides a reasonable basis for our opinion. | No comment. |

| Para No. | Separate Audit Report of A.G. | Comments by Water Resources Department, Mantralaya, Mumbai |
|---|---|---|
| **4.** | **Based on our audit, we report that** | |
| 4.1 | We have obtained all the information and explanations, which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of our audit. | No comments. |
| 4.2 | The Balance Sheet, Income and Expenditure Account and Receipt and Payment Account dealt with by this report have been drawn up keeping with Chapter V Section 19 (1) of Maharashtra Water Resources Regulatory Authority (MWRRA) Act, 2005. Income is accounted for on cash basis and expenses have been accounted for on accrual basis. The Annual Accounts for the year 2013-14 was approved by the Authority on 25th June, 2014. | No comments. |
| 4.3 | In our opinion, proper books of accounts and other relevant records have been maintained by the Authority as required under Section 19(1) of Maharashtra Water Resources Regulatory (MWRRA) Act, 2005 in so far as it appears from our examination of such books. | No comments. |

| Para No. | Separate Audit Report of A.G. | Comments by Water Resources Department, Mantralaya, Mumbai |
|---|---|---|
| | We further report that: | |
| 5. | **Balance Sheet**<br>**Assets**<br>*G) Cost of Accommodation Rs. 22. 88 crore*<br>This represents the total lease premium paid to the State Industrial and Investment Corporation of Maharashtra (SICOM) Ltd as on 31/03/2013 for transfer of lease rights of office premises occupied by MWRRA. This should have been amortized during the remaining period of lease (i.e. 35 years).<br>This had resulted in over statement of assets and understatement of expenses by Rs. 0.65 crore. | Remarks are noted by MWRRA and hence no comments. |
| 6.<br>6.1 | **General**<br>**Balance Sheet**<br>**C. Fixed & Other Assets- Rs. 1.13 crore**<br>Vide G. R. No. ITS/ File-07/ Pr.Kr.-89/ 39, dated 01 August, 2011, Government of Maharashtra has fixed the life of Computers, Laptops, Printers, Servers and other IT instruments as five years and thus the rate of depreciation worked out to 20 percent. However, the Board charges depreciation for the same at the rate of 60 percent resulting in understatement of Assets and overstatement of Expenditure to that extent. | Remarks are noted by MWRRA and hence no comments. |

| Para No. | Separate Audit Report of A.G. | Comments by Water Resources Department, Mantralaya, Mumbai |
|---|---|---|
| 6.2 | **Non depiction of previous years Balance in Statement of Annual Accounts.**<br>The Maharashtra Water Resources Regulatory Authority has not exhibited the corresponding figures of accounts of the previous year (2012-13) in the Statement of accounts viz, Receipt and Payment Account, Income and Expenditure Account, Balance Sheet and relevant schedules. | Remarks are noted by MWRRA and hence no comments.. |
| 6.3 | **Significant Accounting Policies, Notes on Accounts etc.**<br>The significant Accounting policies and Notes on Accounts attached with the financial statements did not contain details regarding method of depreciation, basis of preparation of accounts, valuation of Investment, advances and provisions thereon, treatment of retirement benefits, valuation of Fixed Assets, treatment of contingent liabilities, provision for taxation etc. | Remarks are noted by MWRRA and hence no comments. |
| 7 | **Effects of the audit comments :**<br>The net impact of the audit comments given in the proceedings paragraphs is that as on 31st March 2014, Assets were overstated and Expenses were understated by Rs. 0.65 crore | Remarks are noted by MWRRA and hence no comments. |
| 8. | **Grants-in-Aid**<br>Out of total grants of Rs. 2.43 crore (which includes an unspent balance of Rs. 0.44 crore of the year 2012-13 and grants received during the year Rs. 1.99 crore), the Authority | No comments. |

| Para No. | Separate Audit Report of A.G. | Comments by Water Resources Department, Mantralaya, Mumbai |
|---|---|---|
| | utilized a sum of Rs. 2.43 crore leaving a 'NIL' balance as on 31st March 2014. | |
| 9. | Subject to our observations in the preceding paragraph, we report that the Balance sheet, Income & Expenditure Account and Receipt & Payment Account dealt with by this report are in agreement with the books of accounts. | No comments. |
| 10. | In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the said financial statements read together with the Accounting Policies and Notes on Accounts, and subject to the significant matters stated above and other matters mentioned in Annexure-I to this Audit Report give a true and fair view in conformity with accounting principles generally accepted in India.<br>In so far as it relates to the Balance Sheet, of the State of affairs of the Maharashtra Water Resources Regulatory Authority as at 31 March 2014; and<br>In so far as it relates to the Receipts & Payment Account Income & Expenditure Account of Excess of Expenditure over Income for the year ended on that date. | No comments. |

# *Annexure*

| *Sr. No.* | *Separate Audit Report of A. G.* | *Comments of Water Resources Department, Mantralaya, Mumbai* |
|---|---|---|
| 1. | **Physical Verification of Fixed Assets**<br>The Authority is maintaining Fixed Assets Register. Physical verification of Fixed Assets was conducted on 1st April 2014 and a certificate to this effect has been recorded. | No comments. |
| 2. | **Adequacy of Internal Audit System and Control Mechanism**<br>Separate Internal Audit wing is not in existence, but the internal audit is conducted by the Statutory Auditors (Chartered Accountants) for the year 2013-14 in June 2014.<br>The Authority has conducted surprise verification of cash between May 2013 and March 2014.<br>MWRRA had not laid down the financial powers of its authorities for incurring expenditure. In its absence it could not be verified whether the expenditure was incurred by the competent authority. | The work of MWRRA is of quasi-judicial in nature and there is no construction or field work. Also, internal Audit (test audit) of MWRRA is carried out by the Chartered Accountant as per directives of the Accountant General.<br>Hence, a separate Internal Audit System and Internal Control Mechanism is not required. However, surprise verification of cash is done w.e.f. May 2013 onwards.<br>In general, the Government agrees with compliance made by MWRRA. |

| *Sr. No.* | *Separate Audit Report of A. G.* | *Comments of Water Resources Department, Mantralaya, Mumbai* |
|---|---|---|
| **3.** | **Regularity in payment of Statutory Dues**<br>All the Statutory dues i.e. Income tax. Provident fund, Group Insurance Scheme, Professional Tax are paid regularly by the Authority. | No comments. |

For and on behalf of the
Comptroller & Auditor General of India

Sd/-

Principal Accountant General (Audit)

Place :- Mumbai

Date :- 26-12-2014

Sd/-

Principal Secretary
Water Resources Department
Mantralaya,

Date :- 16-3-2015

9th Floor, Centre – 1 World Trade Centre, Cuffe Parade,
Mumbai – 400005. Tel.2215 2019 Fax 2215 3765
Email: mwrra@mwrra.org